**Impact Factor Value : 6.067** **I S S N- 2278-9308**

# Sanshodhan Samiksha

Humanities,Social Sciences,Commerce, Education, **and**
language& Law
Monthly
Peer Reviewed International Research Journal
Special Issue

# July - 2017

**Chief Editor**
**Prof.Virag S.Gawande**

**Editor**
**Dr.Sanjay j. Kothari**
**Social Sciences**

**Editor**
**Dr. Dinesh W.Nichit**
**Commerce**

**Published By**
Aadhar Publication – Amravati
( M.S.) India 444604

# INDEX



| | | | |
|---|---|---|---|
| 1 | Dr. S.N.Waghule | E-Governance Strategy:Reduce Correption | 1 |
| 2 | Sanjay P.Pawar | Role of Women Entrepreneurship In Rural Development Of India | 5 |
| 3 | Aparna Dalvi and Sarita C. Deshpande | A Relationship between English Creative Writing Skills and Academic Performance of C.B.S.E. and State Board School Children | 9 |
| 4 | Dr. Uddhav Jane, | Postmodern Literature and Literary Theories | 14 |
| 5 | Prof. Smita Ameya Wagh<br>Prof. Dr. Malhar Kolhatkar | Role Of Training In Employees Retention In It Sector | 22 |
| 6 | Ketan Gautam Wakode | [Indian Women : Past Present And Future]A Study Of Social-Economical Problems Of The Women Domestic Workers In Akola District. | 30 |
| 7 | Anchal Arora<br>Dr.H.S.Chahal | Critical Evaluation of Antecedents of Consumer's Perception towards Green Electrical Cooling Appliances | 36 |
| 8 | Dr.D.B.Borade | E-Governance In India –Hard But Bright Perspective | 42 |
| 10 | तक्षशिला मोटघरे | हमाल वर्गातील पाल्यांच्या शैक्षणिक समायोजन क्षमतेचा अभ्यास | 49 |
| 11 | डॉ. पी.के. कांबळे<br>श्री. कैलास यशवंतराव यावले | भारतीय उत्तर शास्त्रीय संगीतातील राग : जयजयवंती चे सांगीतिक अध्ययन | 54 |
| 12 | डॉ. शारदा आय. महाजन<br>प्रा. शशीकांत जे. चवरे | भारतीय महिलांमधील राजकीय उदासीनता (केंद्रीय पातळीवरिल निवडणुकांच्या संदर्भात) एक विश्लेषणात्मक अध्ययन | 57 |
| 13 | प्रा.डॉ.एस.जी.राक्षसे | आसियान आणि भारत संबंध | 67 |
| 14 | प्रा.डॉ. व्ही. एम. गवई | बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था : कार्यप्रणाली | 70 |
| 15 | प्रा. डॉ. कृष्णा आ. माहुरे | संविधान सभेतील डॉ. पंजाबराव देशमुख यांचे योगदान | 74 |
| 16 | डॉ. रजनी मामीडवार | बालवयातील लठ्ठपणा समस्या व उपाय | 80 |

| | | | |
|---|---|---|---|
| 17 | डॉ. लता पवार | 'जू' नावडत्या भारतीय स्त्री जीवनाचे 'दस्तऐवज' | 83 |
| 18 | प्रा. विजय एम. घुबळे | भारतातील समाजातील स्वयंसेवी संस्थांचे कार्यक्षेत्र आणि विकासातील भूमिका | 88 |
| 19 | प्रा. संजीव वि. भुयार | भारताच्या बदलत्या राजकीय नकाशाचे ऐतिहासिक अध्ययन | 97 |
| 20 | प्रा.चांगदेव केशवराव भाजीखाये | शेतीचे व्यवस्थापन व शेतक–यांच्या आत्महत्या | 104 |
| 21 | प्रा. मधुकर खंडू पवार | सत्यशोधक अण्णासाहेब लठ्ठे | 111 |
| 22 | डॉ. सचिन जगन्नाथ होले | अमरावती शहरातील नागरी कुटुंब संस्थेमधील तांत्रिक परिवर्तनाचे अध्ययन | 115 |
| 23 | डॉ. अे.जी. वानखडे | १००० व ५०० रु.च्या नोटा चलनातुन बाद केल्यामुळे भारतीय अर्थव्यवस्थेवर होणारा परिणाम | 119 |
| 24 | प्रा. नंदकिशोर प्रेमचंद सिंगाडे | बचतगटांसाठी मार्केटींग - शोध बाजारपेठेचा | 122 |
| 25 | प्रा. कु. शीला सोमनाथ कापसे | डॉ. आंबेडकर यांचे शेतीसंबंधीचे विचार व योगदान | 126 |
| 26 | प्रा.दिलीप शहाडे | राष्ट्रीय भारत परिवर्तन संस्था / निती आयोग | 133 |
| 27 | Prof.DrSuprabha P. Yadgirwar, | Incorporation of Principle of Fair Trial in Constitution: An Appraisal of Rights of Accused under Constitution of India | 136 |
| 28 | Dr. Prakash U. Jawanjal | Economic View Of Dr.Panjabrao Deshmukh | 141 |
| 29 | प्रा. के. व्ही. ढवळे | नोट बंदी व भारतीय अर्थव्यस्था | 144 |
| 30 | डॉ. विष्णू नामदेव लांडे | प्रयोगशील व प्रेरणादायी व्यक्तिमत्व जॉर्ज वॉशिंग्टन कार्व्हर | 147 |
| 31 | डॉ. प्रमोद म. बावणे | मेळघाट प्रदेशातील वसाहतीवर जलसंसाधनाच्या प्रभावाचा भौगोलिक अभ्यास | 152 |
| 32 | प्रा. डॉ. प्रसाद शं. मडावी | ख्याल गायन शैली तथा ख्याल गायन में बंदिशों का महत्व | 156 |
| 33 | प्रा. नंदकुमार रामचंद्र कोल्हापूरे | महाराष्ट्रातील दलित वस्ती: एक अवलोकन | 160 |
| 34 | प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे, | मराठी कथेतील मुरळीचे विशेष | 165 |

# मराठी कथेतील मुरळीचे विशेष

प्रा.डॉ.मनमोहन विश्वनाथ राजे,
शिवराज महाविद्यालय,गडहिंग्लज, जि. कोल्हापूर.

१. प्रस्तावना :

मराठी साहित्यामध्ये कथा, कादंबरी, काव्य, नाटक इ. वाङ्मयप्रकार आहेत. 'कथा' हा वाङ्मयप्रकार काव्याइतकाच जुना समजला जातो. महानभाव वाङ्मयामध्ये प्रासंगिक दृष्टांतपर कथा आढळतात. करमणूक कालखंडामध्ये हरिभाऊ आपटे हयांनी आपल्या कथा 'करमणूक' मधून प्रकाशित केल्या. कथांमधून त्यांनी सामाजिक ज्वलंत प्रश्नांना वाचा फोडली. पुढे का.र. मित्रांनी 'मनोरंजन' मासिक सुरू केले. वि.सी. गुर्जर, शि.म. परांजपे, दिवाकर कृष्ण इ. कथाकारांनी लेखन केले. पुढे १९२६ ते १९४५ हा 'यशवंत', 'किर्लोस्कर' मासिकांचा कालखंड. ना. सी. फडके, वि. स. खांडेकर हे हया कालखंडाचे प्रमुख कथाकार होय. ना. सी. फडक्यांनी निखळ कलावाद जोपासला तर खांडेकरांनी जीवनवाद रूजविला. त्यानंतर प्रादेशिक, ग्रामीण, दलित, नवकथा हया स्वरूपामध्ये कथालेखन झाले. आपटे हयांच्यापासून खऱ्या अर्थाने कथेला प्रारंभ झाला. ग्रामीण जीवन व तेथील माणूस केंद्रस्थानी राहिला. साहित्य हा समाजाचा आरसा समजला जातो. समाजामध्ये जे जे घडते त्याचे चित्र साहित्यामध्ये उमटते. लेखकाला समाजामध्ये विविध अनुभव येतात. ते तो कलात्मकतेने साहित्यामध्ये चित्रण करतो.

मराठी साहित्यातून मनोविश्लेषणावर लेखन होऊ लागले. मनोविश्लेषणच्या बाबतीत ऑस्ट्रियन मानसशास्त्र सिग्मंड फ्रॉइड हयांनी काही सिद्धांत मांडलेले आहेत. ''मनोविश्लेषण म्हणजे फ्राईड हयांच्या सिद्धांत चौकटीला धरून केलेले मनाचे अन्वयन आणि स्पष्टीकरण होय.''[१] साहित्य, धर्म, कला, पुराणकथा, संस्कृती हयासंदर्भात फ्रॉईड हयांनी प्रकाश टाकलेला आहे. चित्र, बुद्धिविचार, तर्क, स्मृती इ. चे अधिष्ठान असणे म्हणजे मन होय. मराठी कथेमध्ये त्या अनुशंगाने विचार झालेला आहे.

२. देवदासी :

भारतीय संस्कृतीमध्ये देवधर्माला स्थान दिले असून, त्यामध्ये स्त्री अधिक प्रमाणात गुंतलेली आहे. स्त्री जशी पुरूषाची सेवा करते किंवा त्याला कामभोग देते, त्याप्रमाणे ती पद्धत देवधर्माच्या बाबतीत ठेवली. स्त्री पुढे माणसाची दासी होता होता, देवाची दासी झाली. म्हणजेच देवदासी बनली. ''देवदासी म्हणजे एखाद्या देवतेला वाहिलेली मुलगी. अपत्यप्राप्तीकरिता किंवा अपत्य जगण्याकरिता पालक पहिले मूल देवाला वाहण्याचा नवस करतात. त्यालाच देवदासी म्हटले आहे.''[२] देवदासी करण्यामध्ये धर्म कारणीभूत ठरला आहे. धर्मामुळेच सर्वसामान्य जीवन जगणारी स्त्री देवदासी बनते. ती देवदासी बनल्यामुळे तिच्यावर अन्याय अत्याचार होतात. तिला अविवाहित रहावे लागते. अविवाहित राहून देवाची सेवा करता करता माणसाची सेवा करते. त्याला कामभोग देते. देवदासीची प्रथा स्त्रीवर अन्याय अत्याचार करणारी प्रथा आहे.